# महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

(औषध व्यवसाय अधिनियम १९४८ च्या अंतर्गत घटित)
आर-स्क्वेअर, चौथा मजला, राज्य कामगार विमा योजना रुग्णालयासमोर, लाल बहादूर शास्त्री मार्ग, मुलुंड प. मुंबई-४०००८० दूरध्वनी क्र. २५६८४२९१ , फॅक्स २५६८४४१८
ईमेल - mspcindia@gmail.com वेबसाईट - www.mspcindia.org

---

## ऑनलाईन रजिस्ट्रेशन बाबत महत्वाची नोटिस

## !!!! सर्व फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना !!!!

पंजीकरण प्रक्रिया अधिक सुकर करण्यासाठी **दिनांक ७ ऑगस्ट,२०१८ पासून** महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून **ऑनलाईन पंजीकरण सिस्टीमद्वारे** ज्या विद्यार्थ्यांना सदरहू परिषदेकडे त्यांच्या नावाची नोंदणी करावयाची आहे त्या विद्यार्थ्यांना अर्ज दाखल करण्याची सुविधा खुली करण्यात येत आहे.

दिनांक ७ ऑगस्ट,२०१८ पासून ज्या विद्यार्थ्यांनी औषध व्यवसाय अधिनियम,१९४८ च्या कलम १२ अंतर्गत भारतीय औषध व्यवसाय परिषदेकडून मान्यताप्राप्त महाविद्यालयातून फार्मसी पदवी (Degree), पदविका (Diploma) वा फार्म.डी ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केली असेल त्यांनी **online.mspcindia.org** या संकेतस्थळावर **(Website)** लॉग इन करुन आपला पंजीकरणाचा अर्ज दाखल करावयाचा आहे. दिनांक ७ ऑगस्ट,२०१८ पासून ऑफ लाईन अर्ज या कार्यालयात समक्ष, कोणत्याही प्रतिनिधीद्वारे वा अन्य कुठल्याही मार्गाने कुठलेही कारण दिले तरी स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

या सिस्टीम मध्ये ऑनलाईन अर्ज दाखल करणे, आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करणे, फोटो व सही अपलोड करणे व payment gateway द्वारे फी भरणे ही प्रक्रिया समाविष्ट आहे. सिस्टीमद्वारे मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी कार्यालयाच्या भेटीची तारीख व वेळ (Appointment) आपणास प्राप्त होईल. त्यानंतर त्या विद्यार्थ्याने भेटीच्या दिवशी मूळे कागदपत्रे घेऊन परिषदेच्या कार्यालयामध्ये हजर रहावयाचे आहे. याविषयी तपशीलवार माहितीकरीता online.mspcindia.org या संकेतस्थळास भेट द्या. त्यावर ऑनलाईन सिस्टीमद्वारे अर्ज भरणे व संबंधित प्रक्रियेबाबत माहितीपत्रक, मार्गदर्शिका, Flow chart इ. उपलब्ध आहे.

सही/-

ठिकाण :- मुंबई

निबंधक

दिनांक :- २६.०७.२०१८

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद